# हरवले ते गवसले का?

**प्रल्हाद जाधव**

**पात्र संयोजन**

**प्रा.अविनाश यमगर (७५)**
**सौ.आशालता यमगर (७०)**
**कु.सम्यक (०८)**


**सूचना**

या एकांकिकेचे सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत.
तिचे प्रयोग, रुपांतर, भाषांतर
वा कोणत्याही प्रकारच्या माध्यमांतरापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.



संपर्कासाठी पत्ता
pralhadjadhav.one@gmail.com
992077626

(प्रा.अविनाश यमगर (७५) यांचे मुंबईतील घर. घरी ते आणि त्यांची पत्नी आशालता (७०) आज त्यांच्या लग्नाचा ३५वा वाढदिवस. वेळ सकाळी १०.३० ते ११.०० ची.)

सौ. : अहो, काय शोधताय? काय खुडबूड चाललेय सकाळपास्नं?

प्रा. : काय शोधतोय ते माझं मलाच कळत नाही.

सौ. : मी काही मदत करू का?

प्रा. : *त्रिखंड हिंडुनी धुंडतसे,*
*परि न गवसे हरपले ते...*

सौ. : आयुष्यभर नुसते कोड्यात बोलत आलात.

प्रा. : कोडं नाही हे, केशवसुतांची कविता आहे, हरपले श्रेय...

सौ. : आमच्या दृष्टीनं कोडंच ते. आधी माहीत असतं तर लग्नच केलं नसतं तुमच्याशी.

प्रा. : इतकी वर्ष जाऊनही-

सौ. : तुमची भाषा मला अजून कळत नाही, असंच म्हणायचंय ना तुम्हाला?

प्रा. : मी कशाला म्हणू तसं! माझ्या श्वासाची लय जरी बिघडली तरी लगेच लक्षात येतं तुझ्या...

सौ. : पुन्हा बोललात कोड्यात...

प्रा. : तुला कळतं सर्व मला काय म्हणायचं असतं ते, आणि माझं कोडं तयार होण्याआधीच तुझं उत्तरही तयार असतं.

सौ. : (देत) घ्या, मफलर शोधताय ना?

प्रा. : चॅयला, तुझ्यासारखी ग्रेट बाई दुनियेत शोधून सापडायची नाही दुसरी...

सौ. : हरभऱ्याच्या झाडावर चढवू नका आता, आवरा पटापट, निघायचंय ना?

प्रा. : अगं काय घाई चाललेय तुझी, वेळ आहे अजून... आणि मी आवरतो दोन मिनिटात, तूच तुझं ते साडीबिडी बदलायचं बघ, एकेक तास जातो तुझा त्यात...

सौ. : कोणती साडी नेसू?

प्रा. : नेस कोणतीही, काही फरक पडत नाही त्यामुळं. आधी मला चहा करून दे मस्तपैकी म्हणजे झालं- थंडी किती पडलीय.

सौ. : प्रत्येक साडीशी कोणती ना कोणती आठवण जोडलेली आहे.

प्रा. : म्हणजे आज तू लग्नात नेसलेली साडी घालणार.

सौ. : लग्नाचा वाढदिवस-

प्रा. : लक्षात होता माझ्या. पस्तीस वर्ष झाली.

सौ. : गणितसुद्धा सुधारलंय तुमचं!

प्रा. : त्याचं क्रेडिट फेसबुकला. सकाळपास्नं पन्नास तरी मेसेजस आले असतील. आणि या वॉट्सॅपची टूरटूर तर रात्रीपासून सुरू आहे... जावईबापूंनी विश केलंय लंडनहून.

सौ. : दरवर्षी न चुकता मेसेज येतो त्यांचा. काय म्हणतात?

प्रा. : तुम्ही हाफ सेंच्युरीतरी मारणार लग्नाची, असं म्हटलंय.

सौ. : पन्नास लग्न?

प्रा. : लग्नाची पन्नास वर्ष.

सौ. : चला, म्हणजे मराठी भाषा-बिघाडाचं सार्वत्रिक लोण लंडनपर्यंत जाऊन पोहोचलं म्हणायचं तर...
(दोघेही हसतात)

प्रा. : चहाचं बघतेस ना!

सौ. : हो, करते पण-

प्रा. : 'जरा साखरेचा डबा काढून द्या' असंच ना?

सौ. : तेवढं बरोबर लक्षात राहातं तुमच्या.

प्रा. : पस्तीस वर्ष रोज ड्यूटी करतोय ती, काय विसरणार? 'आलिया भोगासी असावे सादर...'
आपले जावईबापू एवढे मोठे शास्त्रज्ञ-

सौ. : मग?

प्रा. : त्यांना सांगतो एकदा-

सौ. : काय?

प्रा. : पाईपमधून गॅस जसा डायरेक्ट किचनमध्ये येतो तशीच साखरसुद्धा आली पाहिजे... हा नळ सोडला- साखर, हा नळ सोडला-चहापावडर, हा नळ सोडला- दूध! (साखरेचा डबा देत)घे!

सौ. : किती आळशी हो तुम्ही, एक काम सांगितलं तर किती मोठं लेक्चर देताय...

प्रा. : ते गणिताचं काय म्हणत होतीस मघाशी?

सौ. : कसलं गणित?

प्रा. : गणित सुधारलंय म्हणून म्हणत होतीस ना माझं...

सौ. : ते गंमतीनं. प्रत्यक्षात गणित आणि स्मरणशक्ती दोन्ही बिघडत चाललीय तुमची.

प्रा. : एक्झॅक्टली हेच सांगणार होतो मी तुला आता! सत्तर वर्षांच्या या भल्यामोठ्या आयुष्यात काय मिळवलं आणि काय गमावलं याचा मेळच लागत नाही. जावई 'नासा'त शास्त्रज्ञ, मुलगा जगप्रसिद्ध सॉफ्टवेअर कंपनीत कामाला, चंद्रसूर्यासारखी नातवंड, शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातली चाळीस वर्षांची निष्कलंक सेवा, नामवंत प्रकाशन संस्थांनी प्रसिद्ध केलेली डझनवारी पुस्तकं, ठेवायला जागा नाही इतके लेखन पुरस्कार आणि सावलीसारखी सोबत करणारी पत्नी... एवढं असूनही कसलीतरी खंत, कसलीतरी रूखरूख, काही तरी हरवल्याची जाणीव छळत राहतेच मनाला...

सौ. : *त्रिखंड हिंडुन धुंडीतसे*
*परि न गवसे हरपले ते...*

प्रा. : बरोबर! आपल्या असण्यामुळे या जगाला असं नेमकं काय मिळालं आणि आपण नसू तेव्हा या जगानं काय गमावलेलं असेल याचं अचूक उत्तर काढता येत नाही. नुसता गोंधळ, नुस्तं धुकं ... एक निरर्थक पोकळी... त्यापेक्षा मेंढरांच्या एखाद्या कळपामागं रानोमाळ भटकलो असतो किंवा नियमितपणे आषाढी-कार्तिकीची पायी वारी केली असती तर अधिक समाधान मिळालं असतं, असं वाटतं आता...

सौ. : सोलापुरची मुळं काही सुटत नाहीत तुमची.

प्रा. : खंरच. चार-पाच वर्षाचं तिथलं बालपण पण तिथली माळरानं- मेंढरांचे कळप... त्या मागनं फिरणारे उघड्या अंगाचे धनगर... ही सगळी चित्रं वारंवार मनासमोर उभी राहतात, मातीशी जोडून ठेवतात, दिलासा देतात... घुंगराची काठी, डोक्याला मुंडासं, खांद्यावर कांबळं, हातात भलंमोठं कडं, पायात तोडा- असा निर्मळ, हसतमुख धनगर हे आजच्या गोंधळलेल्या जगाला शहाणपणाचा रस्ता दाखवणार प्रतीक वाटतं मला.

सौ. : चला जाऊन येऊ सोलापूरला... पंढरपूरलापण जाऊ. विठ्ठलाचं दर्शन घेऊन येऊ. तेवढंच बरं वाटेल जीवाला..

प्रा. : सत्तर वर्ष झाली पण पंढरपूरची वेस कधी ओलांडता आली नाही. एवढे काय दिवे लावत होतो मी मुंबईत, लक्षातच येत नाही. आयुष्यभर श्रद्धा- अंधश्रद्धेच्या सीमारेषेवर लटकत राहिलो... आणि आता तर त्या लटकण्याचीच सवय झाली! जाऊद्या, यायचा असेल तर तो विठ्ठलच भेटायला येईल आपल्याला एकना एक दिवस, पुंडलिकाला भेटण्यासाठी थांबला नाही विटेवर!

सौ. : चला एवढा तरी साक्षात्कार झाला आयुष्यात हे काही कमी नाही, घ्या. (चहा देत)

*असो नसो भाव आम्हा, तुझिया ठाया*
*कृपा दृष्टी राहे माझ्या पंढरीराया...*
(तो चहा घेऊ लागतो. फोन वाजतो. ती चहा घेता घेता फोनवर बोलू लागते.)

सौ. : (फोन घेत त्याला) विश्वजितचा आहे. (फोनवर) बोल रे बाळा, कसा आहेस तू? हेमा कशी आहे? वा, छान- देवाची कृपा. सम्यक कसा आहे? तिसरीत गेला ना यंदा? वा वा-छान! आनंदात रहा सगळे, एकमेकांची काळजी घ्या... का फोन केला होतास? अरे हो, थँक्यू थँक्यू. बरोबर, पस्तीस वर्ष झाली. इतका मोठा काळ गेला असेल यावर विश्वासच बसत नाही... बेत वगैरे कसला आलाय आता या वयात? जेवायला बाहेर जाणार आहोत एवढंच! (थांबून) ताईचा फोन येतो का रे कधी? बरं... बरं... छान. एकमेकांना धरून राहा रे बाबांनो. कुठं न्यूयॉर्क, कुठं लंडन आणि कुठं मुंबई... ठेवू मग? आँ? काय म्हणतोय सम्यक? आजोबांना सरप्राईज गिफ्ट पाठवा म्हणतोय काहीतरी... काही नको गिफ्ट वगैरे... तुम्ही आनंदात राहाणं हीच आमच्यासाठी खरी गिफ्ट आहे. हो-हो-आणि आजोबा गोष्ट सांगणार आहेत म्हणावं रात्री, स्कायपीवरनं! हो, हो, नवी गोष्ट... प्रतिभेचा अक्षय झराच आहे म्हणावं तुझे आजोबा म्हणजे! ठेवू मग? बरं... बरं... बरं बाळा, ठेवते!
(ठेवते. कपबशा आवरायला घेते)

प्रा. : काय म्हणालीस तू आता?

सौ. : कधी काय? आणि तुम्ही आवरायला घ्या पटकन. लग्नात घातला होता तो सूट घाला आज.

प्रा. : ते प्रतिभेचं?

सौ. : प्रतिभेचा अक्षय झरा असं म्हटलं मी तुम्हाला- काही चुकलं का त्यात माझं?

प्रा. : उगाच मानभावीपणानं बोलू नको.

सौ. : नाहीतर काय? चूल आणि मूल- आणि तसलीच काही सटरफटर कामं आमच्याकडं...

प्रा. : गेली पस्तीस वर्ष साखरेचा डबा रोज काढून देतोय हे कमी महत्त्वाचं आहे का?

सौ. : मुलांचं ढुंगण धुतलंत कधी, अगदी खरं सांगा?

प्रा. : आणि मग कॉलेज कुणी बघितलं असतं, एवढी मोठी इन्स्टिट्यूट कशी उभी राहिली असती, आणि एवढा मोठा माझा हा लेखनप्रपंच कुणी सांभाळला असता? दूरदृष्टी पाहिजे माणसाला!

सौ. : मला बघायला आलात- तेव्हा काय प्रश्न विचारला होतात आठवतंय ना?

प्रा. : मुलांचा हागमूत काढता येतो का!

सौ. : विचारला होता ना?

प्रा. : माझी दूरदृष्टी लक्षात यावी तुझ्या, हा हेतू होता.

सौ. : आली ना, आली की लक्षात! 'तू माझी स्फूर्ती देवता, माझी प्रेरणा' असं म्हणून एका वाक्यात आयुष्यभरासाठी एक गुलाम विकत घेतलात तुम्ही.

प्रा. : कशाला तलवार उपसतेस सकाळी सकाळी, आणि तेही लग्नाच्या वाढदिवशी?

सौ. : एक निरुपद्रवी मुंगी हातात तलवार घेऊन फिरतेय-कसं वाटतं चित्रं?

प्रा. : पण मुंगी होऊन साखर खाल्लीस की नाही आयुष्यभर?

सौ. : (त्याचं वाक्य ती बोलते) आणि तेही साखरेचा डबा तुमच्याकडून काढून घेत! (दोघेही खुशीनं हसतात) सगळं छान झालं- काहीही मिळवायचं राहिलं नाही- आता संध्याकाळची सुंदर दिवेलागण अनुभवायची...

प्रा. : फार सोसलंस तू. संधी असूनही कधी भांडवल केलं नाहीस.

सौ. : कसलं?

प्रा. : भागवतांची विमल ते यमगरांची आशालता, हा प्रवास फार कठीण होता तुझ्यासाठी... सहन करायलाही खूप सामर्थ्य लागतं माणसाला हे लक्षात घे.

सौ. : कशाला उकरताय ती जुन्या आठवणींची थडगी?

प्रा. : लोकांनी किती गहजब केला- सख्ख्या आईनं घराबाहेर काढणं हा तर कळसच झाला सगळ्याचा...(संगीत)

सौ. : तुम्हीसुद्धा काही कमी सोसलं नाही. पण कधी तक्रार केली नाहीत की, साधं डाफरला नाहीत माझ्या अंगावर. खरंतर आज तुम्ही जे काही नाव मिळवलंय त्याचं क्रेडिट तुमच्या त्या सहनशक्तीलाच दिलं पाहिजे.

प्रा.: थँक्यू, मॅडम! तुमचं हे अहिंसेच एका ओळीचं मानपत्र ज्ञानपीठ पुरस्कारापेक्षा मोलाचं वाटतं मला, धन्यवाद!

सौ. : (हसत) एकदा एका माणसाच्या थोबाडीत मारलं होतंत ते विसरु नका.

प्रा. : आयुष्यातली एकमेवाद्वितीय घटना होती ती! समोरच्या सीटवर बसून सिग्रेट ओढत होता लेकाचा- एकदा सांगितलं, दोनदा सांगितलं पण ऐकेना अजिबात. उलट एक मोठा झुरका घेऊन धूर तुझ्या तोंडावर सोडला त्यानं तेव्हा गेलं माझं डोकं... अशी खाड्कन दिली ठेवून की चड्डीत मुतला तो...कुठनं ताकद आली माझ्या अंगात कुणास ठावूक!

सौ. : होतं कधी कधी असं... आणि हा असा क्षणिक उद्रेक हीच माणसाची खरी ओळख असते...

प्रा. : कलेचंसुद्धा म्हणशील ना- तर तिच्या विध्वंसातच तिचं भलेपण दडलेलं असतं.

सौ. : काय?

प्रा. : कलावंताला आपल्या निर्मितीचा नाश करता आला पाहिजे.

सौ. : नाश करून काय करणार?

प्रा. : त्याशिवाय नवनिर्मिती होऊ शकत नाही!

सौ. : अहो, नक्की काय म्हणायचंय तुम्हाला? क्लासरूममध्ये बोलत नाही आहात तुम्ही.

प्रा. : ब्रह्मदेव जन्माला घालतो, विष्णू वाढवतो आणि शंकर विनाश घडवून आणतो- उत्पत्ती-स्थिती आणि लय... हेच तत्त्व कलेच्या क्षेत्रात स्वीकारलं पाहिजे माणसानं, जसंच्या तसं.

सौ. : जगायचं तरी कशाला मग?

प्रा. : तेच सांगतोय मी तुला. आपल्याला वाटतं आपण जगलो, यश मिळवलं, प्रॉपर्टी केली- पण भ्रम असतो तो! सापळे असतात हे सारे, आपणच निर्माण केलेले... आपण खुशीने अडकत असतो त्यात आणि त्यातूनच जन्माला येते आपली सारी तडफड...काहीतरी हरवल्याची खंत-(संगीत) सालं हे लक्षात आलं पाहिजे माणसाच्या. तुला ती फुलपाखराची गोष्ट माहीत आहे ना... ते असं मस्त गोलगोल गिरक्या मारत असतं फुलावरनं. आनंदानं, मजेनं, आपल्याच धुंदीत... बाजूला एक बेडूक लपून बसलेला असतो- तोंड उघडून! आणि मग काय होतं माहिताय, फुलपाखरू एका बेसावध क्षणी त्याच्या तोंडात शिरतं आणि बेडूक तोंड बंद करतो.

सौ. : आई गं, किती क्रूर आहे हे सगळं...

प्रा. : काही क्रूर नाही, उलट त्या फुलपाखराचीच गरज असते ती. ते तिथं बेडकाच्या पोटात अंडी घालतं आणि अंड्यातून पुन्हा फुलपाखराच्या रुपानं बाहेर येऊन पुन्हा त्यांचं गिरक्या घेणं सुरू होतं... फार सुंदर आहे हे सगळं. हे लक्षात आलं पाहिजे माणसाच्या. अनुभवाशी समर्पित होता आलं पाहिजे त्याला निःसंग होण्याची, आयुष्याची कमाई एका क्षणात फुंकून टाकण्याची तयारी असली पाहिजे त्याची. एक मुंडासं, एक धोतर आणि एक घोंगडं पुरेसं झालं त्याला. महावीरानं तर अंगावर लंगोटीसुद्धा ठेवली नव्हती, हे लक्षात घे.

सौ. : झालं तुमचं तत्त्वज्ञानाचं लेक्चर परत सुरू...चला निघुया, पोटात कावळे कोकलायला लागलेत माझ्या... आणि हो-

प्रा. : काय?

सौ. : बाहेर पडताना 'नेक बॅलन्सर' घालायला बजावलंय डॉक्टरांनी.

प्रा. : मला अजिबात आवडत नाही तो गळपट्टा. कसंतरीच वाटतं, शी.

सौ. : तुमच्या आवडीनिवडीचा प्रश्न येतोच कुठे? मी सांगतेय म्हणून घाला. मान डुगडुगायला लागलेय तुमची. कमरेलापण पट्टा पडेल काही दिवसांनी असाच हट्ट करत राहिलात तर. लेखन-वाचनसुद्धा बंद करायला सांगितलंय डॉक्टरांनी, माहिताय ना?

प्रा. : आयचा घो त्या डॉक्टरच्या! (विराम, लाडीक त्राग्यानं) सूटपण घालणार नाही, ज्जा!

सौ. : बरं आजचा दिवस अपवाद. पण निदान टाय तरी घाला लग्नातला. छान दिसतो तुम्हाला...
मीसुद्धा साडी नेसते लग्नातली. (टाय देत) हा घ्या...

प्रा. : नको, त्यापेक्षा मफलर गुंडाळतो मी. मानेला जरा उबही राहते.

सौ. : अहो असं काय करता, प्लीज... आजचा दिवस स्पेशल आहे ना आपल्या आयुष्यातला? हा घ्या, का मीच लावून देऊ?

प्रा. : लग्न करू या का परत?

सौ. : काय हरकत आहे? प्रेम आहे ना तुमचं माझ्यावर?

प्रा. : प्रेम करायचं असलं तर काळीज काढून जांभळाच्या झाडावरती टांगून ठेवायचं असतं...

सौ. : लग्नाआधी म्हणाला होतात असं काहीतरी पण त्याचा अर्थ समजला नव्हता कधी.

प्रा. : प्रेमात पडण्याच्या त्या क्षणी काळ तेथेच थांबलेला असतो. तिथंच, तो क्षण तसाच अश्मिभूत होऊन राहतो कायमचा. त्याचा विस्तार होत नाही की विलय... प्रेमातलं समर्पण हा तर एक छोटासा मृत्यूच असतो त्या क्षणीचा!

सौ. : (हुशार विद्यार्थीनीप्रमाणे) निर्मितीनाशाचं हे आणखी एक रूप!

प्रा. : लाखमोलाचं बोललीस अगदी! आता टाय लावायला हरकत नाही.

सौ. : (टाय त्याच्या डोक्यावरून त्याच्या गळ्यात- आणि तेथून कॉलरच्यामागे ॲडजेस्ट करत भेदकपणे) काय शोधताय सकाळपास्नं?

प्रा. : आँ?

सौ. : काय शोधताय?

प्रा. : मफलर.

सौ. : खरं बोला प्रोफेसर अविनाश यमगर- काय शोधताय एवढं?

प्रा. : *शून्य मनाच्या घुमटात... कसले तरी घुमते गीत...,*

सौ. : म्हणजे?

प्रा. : *कोठूनी येते मला कळेना, उदासिनता ही हृदयाला*
*काय बोचते हे समजेना, हृदयाच्या अंतहृदयाला...*

सौ. : बालकवींच्या पदराआडून बाहेर या, आणि स्पष्टपणे बोला.

प्रा. : अगं काय चाललंय तुझं?

सौ. : बॅगेतून तुमचा टाय काढताना तिथं हे सापडलं- (दाखवते)

प्रा. : काय सापडलं?

सौ. : हे पिंपळपान... (संगीत) बघा किती सुंदर, किती नाजूक, किती जाळीदार...
किती तरतरीत आहे अजून बघा ना! हेच शोधत होतात ना?

प्रा. : अगं कसलं पिंपळपान, फेकून दे ते तिकडं... डोक्याला व्याप नुसता...

सौ. : खरंच फेकून देऊ? नुसता स्पर्श तरी करून बघा एकदा.

(ती ते त्याच्या खांद्यावरून, हातावरून फिरवू लागते पार्श्वभूमीवर एक आर्त आलाप)
आठवतंय काही? कुणाची आठवण ही? कुणाची आठवण? सांगा की, प्रोफेसरसाहेब. (ते गप्पच)

सौ. : अनेक वर्षे पाहतेय मी. उठता-बसता, खाता-पिता, आनंदात-दुःखात, मोकळ्या वेळी किंवा मुद्दाम मोकळा वेळ काढून बोलत बसायचात तुम्ही याच्याशी...याला छातीशी धरायचात, मन मोकळं करायचात. बरोबर?

प्रा. : भास होत असतील तुला काहीतरी...

सौ. : बरोबर, भासच ते. पण भासांच्या त्या वाळवीनं माझ्या आयुष्याच्या रेशमी साडीला कसर लावली ती कायमची. अशी भोकं पाडली, की त्यावर टीप घालता येत नाही की रफू करता येत नाही...
आधी मला वाटायचं की, आपलंच चुकतंय काहीतरी, थांबू-वाट बघू-गोष्टी पुन्हा सुरळीत होतील. पण परिस्थिती अधिकच चिघळत गेली. आज आपल्या लग्नाचा वाढदिवस पण आजसुद्धा सकाळपासून तुम्ही याच्याच शोधात मग्न. माझ्यापेक्षा ती बयाच तुम्हाला अधिक जवळची वाटली... काय नाव तिचं? कुठली राहणारी?

प्रा. : अगं कोण- काय- कुठली बया?

सौ. : विस्मरणशक्ती प्रसन्न आहे अगदी तुमच्यावर, पाहिजे तेव्हा नेमकी धावून येते मदतीला...

प्रा. : वेड लागलंय तुला, येताना डॉक्टरकडे जाऊ आपण, चल आटप लवकर.

सौ. : (आता टायची नॉट ती अधिक सर्तकपणे, थंड निर्धारपूर्वक सरकवत आहे, त्याच्या जागी जणू तिला 'ती' दिसू लागते.) हो लागलंय वेड मला. माझ्या सोन्यासारख्या संसारावर कायमचा फणा काढून बसलीस. तुझ्या अदृष्य पण जहरी विळख्याचं विष माझ्या संसारात कालवलंस, माझी शांतता नाहीशी केलीस, (नॉट आवळत नेते) माझ्या आयुष्याचं दूध नासवलंस रांडे, पण सोडणार नाही मी अशी तुला, घेईन तुझा सूड, करीन तुझं वंशखंडन, चिमूटभर राखसुद्धा उरू देणार नाही मागं तुझी....
(त्वेशानं अंतिम झटका देत) छिनाल- रांड साली! (तो अगं, अगं, हे काय... अगं असं म्हणत सुटकेचा हतबल प्रयत्न करत हातपात झाडत निपचित- गार झालेला. ती हळूहळू टायचे एक टोक ओढते तसतसा टाय एका बाजूने मोकळा होत जातो. तिच्या डोक्यातला खून अजूनही उतरलेला नाही.) दरवर्षी आपली स्फूर्तीदेवता बदलणारे मराठी सारस्वतातील महान प्राध्यापक! (ती त्याचं डोकं हलवून पाहते. मान एका बाजूला कलंडते. संगीत. प्रकाश बदलतो. हातातील टायसह ती 'त्या' बॅगेकडे निघते. तिथं जाऊन हातात पाटल्या, गळ्यात हार, नाकात नथ, अंबाड्यावर गजरा माळते... जणू नववधूसारखी नटते. काही क्षणांनी तिकडूनच) आवरलं का तुमचं? किती वेळ झाला... सकाळपास्नं सांगतेय आटपा लवकर, तरी तुमचं 'ये रे माझ्या मागल्या' सुरू... हे घ्या, हा टाय लावा... (ती पूर्ववत झालेली. टाय घेऊन पुढे येते- जणूकाही प्रसंगाचा तेवढा तुकडा कापून टाकून जगणं पुन्हा व्यवस्थित पुढं सुरू झालं आहे. तो तसाच खुर्चीत. ती त्याला हलवत.) अहो, उठा... डोळा लागला की काय बसल्या बसल्या? तो यांत्रिकपणे तिच्याकडे पाहू लागतो, तिचं बदललेलं रूप बघून चकीत)

सौ. : अहो, असं काय करताय, भूत बघितल्यासारखं?

प्रा. : मला चिमटा काढतेस का जरा प्लीज...

सौ. : (त्याच्या खांद्यावर हात ठेवत) अहो असं काय करताय, जागे व्हा, उठा. आणि बघताय काय माझ्याकडं असं एकटक? पस्तीस वर्षांपूर्वी लग्नात घातलेले कपडे घालायचे आज- असं ठरलं होतं ना आपलं? घ्या हा टाय तुमचा...

प्रा. : (अजूनही तंद्रीत) म... मला, अगं, सम्यक दिसला मला आता.

सौ. : सम्यक?

प्रा. : हो... असा इथं....

सौ. : अमेरिकेतनं इकडं पोहोचायला दोन दिवस लागतात माणसाला... स्वप्न पाहिलं असेल तुम्ही.

प्रा. : (तंद्रीतच) असा इकडनं धावत आला. हसतोय लेकाचा आणि म्हणतोय,'आजोबा गोष्ट सांगा...' कमरेला धोतर, खांद्यावर घोंगडं, हातात घुंगराची काठी, कपाळाला टिळा, डोक्यावर मोरपिसाचा मुकुट.

सौ. : काही खरं दिसत नाही आज तुमचं. येताना डॉक्टरांकडे जाऊ आपण, चला!

प्रा. : अगं असं काय म्हणतेस तू? वेडा झालोय का मी?

सौ. : नाहीतर काय? मोरपीस असतं ते श्रीकृष्णाच्या डोकीवर- विठ्ठलाच्या डोईवर जाईलच कसं ते? आणि धनगराचं घोंगडं विठ्ठल कशाला घेईल खांद्यावर? आणि सम्यकचा तरी धोतर नेसण्याशी काय संबंध? सगळी सरमिसळ करताय तुम्ही जगण्याची. हल्लीच्या भाषेत सांगायचं तर काहीतरी केमिकल लोच्या झालाय तुमच्या डोक्यात...

प्रा. : खरंच वाटतंय तुला असं?

सौ. : अगदी काडीचीही शंका नाही त्यात.

प्रा. : नाही म्हणजे असेल... असेल कदाचित... म्हणजे मला आता असंही दिसलं की गौतमबुद्ध, येशू ख्रिस्त, महमंद पैगंबर, महावीर जैन, झरतृष्ट, विवेकानंद सगळे एका टपरीवर बसून चहा पिताहेत. सॉक्रेटीस, प्लेटो, चार्वाक टेबल-खुर्च्या साफ करताहेत. डार्विनपासून आईन्स्टाईनपर्यंत सगळे संशोधक-विचारवंत गिऱ्हाईकं बनून त्यांच्यातला संवाद ऐकताहेत... (चमत्कारिकपणे गप्प)

प्रा. : (तंद्रीतच) माणसाचा जन्म एकदाच मिळतो बाबांनो, माझं तुझं करू नका, भांडू तंडू नका, गुण्यागोविंदानं रहा. जगण्याला स्पर्धेचं रुप देऊ नका, पैसा पैसा करू नका, प्रॉपर्टीच्या मागं लागू नका, भ्रष्टाचार करू नका, सर्वांना समजून घ्या, स्वतः जगा, दुसऱ्यांनाही आनंदाने जगू द्या... अवघ्या विश्वाला आपलं घर माना. जगण्यावर श्रद्धा ठेवा... जगणं सोपं आहे, ते गुंतागुंतीचं करू नका.

सौ. : (डॉक्टरांना फोन करू लागते) हॅलो, हॅलो, डॉक्टर?

प्रा. : (फोन ओढून घेत) मला काहीही झालेलं नाही, डोकं पूर्णपणे ताळ्यावर आहे माझं.

सौ. : मग माझं फिरलंय असं म्हणायचंय का तुम्हाला?

प्रा. : (दाखवत) त्याचं उत्तर आता हेच देईल, हे बघ- बघितलंस?

सौ. : काय?

प्रा. : (एक मोरपीस काढून तिच्यासमोर धरत) मोरपीस.

सौ. : मोरपीस?

प्रा. : हो, तुला प्रश्न पडला असेल की माझ्याकडं कसं आलं हे!

सौ. : उठा आता, पोटात कावळे कोकलताहेत. नाहीतर भुकेनं मरुन जाईन मी आणि उद्याच्या पेपरात बातमी येईल, लग्नाच्या वाढदिवशी पत्नीचा खून करून पती फरार...

प्रा. : फरार कशाला होईन मी?

सौ. : म्हणजे खुनाचं नक्की ठरलंय!

प्रा. : तुला वाटतंय तशी एखादी भुक्कड रहस्यकथा जन्माला घालायची नाहीये मला. मला फक्त एवढंच सांग, लग्न होऊन आलीस तेव्हापासून तुझ्याकडे आहे हे, कायम पर्समध्ये ठेवतेस, जीवापाड जपतेस, कुणाच्या हाती लागू देत नाहीस... नजरेआड होऊ देत नाहीस... हो की नाही? बोल की, आता का तोंड बंद झालं तुझं? (ते तिच्या गालावरून मानेवरून फिरवतो-संगीत)

सौ. : (जणू पराभूत झालेली) मघाशी तुम्ही त्या पिंपळपानाच्या शोधात माझ्या बॅगेपर्यंत पोहोचलात आणि तिथं,

तुम्हाला लग्नाच्या साडीत, पदराखाली घालून ठेवलेलं दिसलं हे, बरोबर?

प्रा. : कबुलीजबाब मागितला नाही मी तुझ्याकडे. तो कोण-कुठला, कुठे भेटला, कधी भेटला, कुठवर गेल्या होत्या गोष्टी, काही ऐकायचं नाही मला.

सौ. : मला मारायचे विचार येत असतील तुमच्या मनात.

प्रा. : सांगितलं ना तुला आत्ताच की एखादी भुक्कड रहस्यकथा जन्माला घालायची नाही मला आपल्या संसाराची! इतकी वर्ष संसार झाला आपला. सुख-दुःखात सोबत राहिलीस- कधी काही कमी पडू दिलं नाहीस.

सौ. : (त्याच्या थंडपणामुळे ती अधिकच अस्वस्थ झालेली) आलं लक्षात.

प्रा. : काय?

सौ. : (थोडी असंबंध) मोरपिस नाही हे, चाकू झालाय त्याचा.

प्रा. : सरमिसळ मी नाही, तू करतेयस जगण्याची.

सौ. : तुमचं हे गोड बोलणं ह्या मोरपिसाला धार लावण्यासारखं आहे...मोरपिसाचा धारधार चाकू बनत चाललाय... बघा कशी चमकतेय त्याची धार ती! माझ्यावर दया दाखवून त्या उपकाराचं पाणी पाजून अधिक धारदार करताय तुम्ही तो... वाट कसली बघताय, उठा आणि फिरवा मानेवर. क्षणभरही विचलित न होता, कोणतीही दया-माया न दाखवता, (करून दाखवत) आणि ताकद लावायची गरज नाही... अगदी हलक्या हातांनी फिरवायचा...असा... रक्ताची एक पातळशी लालभडक रेघ आणि त्या पाठोपाठ उंच उसळणारं उष्ण लालभडक रक्ताचं कारंजं... खेळ खलास... (तसतशी हळूवार गिरकी घेत ती खाली कोसळते. निपचित. निश्चल. जणू मेली आहे-संगीत)

प्रा. : एखाद्या बेसावध क्षणाचा दगड अकस्मात येऊन मनाचा तळ गाठतो. तळाशी कालवाकालव होते. मग उसळतो चिखलाचा वडवानल, त्याचा भोवरा होऊन वर येतो, अख्खं आयुष्य उलथं पालथं करत भोवंडत राहतो, त्याचं पातं लागून अपराधाचं गळू फुटतं आणि त्यातनं वाहून जातं प्रामाणिकपणाचं अवसान- आयुष्यभर आवरून धरलेलं... (तिच्याकडे पहात) तुला नवरा नको, गळ्यात पट्टा बांधलेला कुत्रा हवा होता- सोबत फिरवायला, आपल्या क्रांतिकारी सामाजिक बांधिलकीचा झेंडा म्हणून मिरवायला! जे मिळालं त्याचा आनंद घेण्याऐवजी जे मिळालं नाही त्याच्या आगीत जळत राहण्याचा, स्वभाव माणसाचा! माझाही त्याला अपवाद नव्हता. हे घे तुझं मोरपीस आणि जपून ठेव पुन्हा तिथंच त्याच ठिकाणी, त्याच साडीच्या पदरात- जसं होतं तसं. मी कधीही हात लावणार नाही त्याला... आणि माझं हे पिंपळपान, तुझ्याच हातानं नेऊन ठेव माझ्या त्या पुस्तकाच्या पानात- जिथं होतं, जसं होतं तसं. तीच त्याची खरी जागा! मोरपीस आणि पिंपळपान आपापल्या जागी असणं हेच आपलं भागधेय. तिथंच त्यांचं सौंदर्य खुलत राहणार आहे आणि त्यानंच आपलं आयुष्य सिद्धही होत राहणार आहे प्रिये... (संगीत) उठ, सगळा चिखल खाली बसलाय आता. वरच्या पाण्यानं पुन्हा निर्मळ अंग धरलंय आणि त्यात कसं डुंबतय बघ या नव्या जाणीवेच्या आनंदाचं चंद्रबिंब! चंद्राची उजळणारी लखलखीत बाजू बघावी माणसानं आणि त्याचा मनमुराद आनंद घ्यावा, त्या दुसऱ्या अंधाऱ्या बाजूकडे काय असेल त्याचा वेध घेण्याचा वेडेपणा कशाला करावा! उठ... आलीस शुद्धीवर? (तिला हळूहळू वर उठवतो. ती भानावर येते)

सौ. : (साक्षात्कार झाल्याप्रमाणे पण पश्चातापदग्ध) साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण झाली.

प्रा. : म्हणजे आता नंतरच्या जगण्यालासुद्धा तसा काही अर्थ राहिलेला नाही.

सौ. : काय म्हणताय?

प्रा. : हो खरंच. लग्नाच्या पस्तीसाव्या वाढदिवशी पत्नीचा खून करून पती फरार, या तुझ्या बातमीत थोडा फरक होईल इतकंच! (थांबून) पत्नीचा खून करून पतीची आत्महत्या!

सौ. : अहो... काय बोलताय-

प्रा. : हो, मात्र एक इच्छा राहून गेली...

सौ. : (आशेने) पांडुरंगाला भेटण्याची? बरोबर ना? खरं सांगा अगदी, तुम्हाला माझी शपथ!

प्रा. : अजूनही वाटतं, मुंडासं गुंडाळावं, एक घोंगडं खांद्यावर टाकावं, हातात घुंगराची काठी घ्यावी. सर्व शहाणपण, जातपात, प्रॉपर्टी, पुरस्कार, जागतिकीकरणाचं अडाणपण पंढरीच्या वेशीपाशी वहाणेप्रमाणं काढून ठेवावं आणि निरिच्छ मनानं विठ्ठलाच्या चरणी समर्पित होऊन जावं...

सौ. : खरंय तुमचं म्हणणं, फार छान वाटलं हो ऐकायला... चला जाऊ आपण (बदलत) मलाबी तुमच्या बरोबर घिऊन चला.. मेंढराच्या लोकरीला चिकटून गवताचं बी जसं गावोगाव प्रवास करीत ऱ्हातं, तशी ऱ्हायले मी आजवर तुमच्यासंगट. म्या यिन तुमच्या मागंमागं, दुरडी उतरुन पाण्याचा तांब्या काढून ठिवंन खाली. रुमाल उघडून भाकर काढून ठेच्यासहीत ठेवीन तुमच्या हातावर. कांदा फोडून दीन रसरशीत आन् तुमच्या डोळ्यातील तृप्तीच्या चंद्रभागेत समाधी घिईन... (तिच्यातील या बदलानं तो चकीत, एक आर्त आलाप सुरू होतो) तुम्ही म्हणताय ते खरं हाय धनी... चुकलेल्या मेंढरागत झालंय माणसाचं जगणं, गोंधळून गेलाय त्यो... त्याला जर कोण श्याणपणाचा मार्ग कोण दावणार असलं तर त्यो गावपंढरीतला मेंढपाळ... झालंच तर विठ्ठलाच्या रुपातला... विठ्ठल... विठूराया... विठाई- माझी विठाई माऊली... (हात जोडत) समदं जग बदललं विठूराया, समुद्राच्या जागी हिमालय वर आला आन् हिमालयाची जागा वाळवंटानं घेटली पण तू मात्र तीळभरही बदलला नाहीस बाबा... तोच रंग, तेच रूप, तीच कृपाळू नजर...

प्रा. : (हात जोडत)

*भंगू दे काठिन्य माझे*
*आम्ल जाऊ दे मनीचे*
*येऊ दे वाणीत माझ्या*
*सूर तुझ्या आवडीचे...*

खरंच, मर्ढेकरांनी किती अचूक शब्दांत सांगितलंय! (संगीत) सापडलं, ज्याचा शोध घ्यायचा होता ते सापडलं. विठ्ठला, थांबव आता साऱ्या यातना, थांबव हा तडफडाट, पायाशी ठाव दे, काळजाशी धर... (दोघेही नमस्कार करत घंटा वाजवण्याची कृती करतात. तसा देवळातल्या घंटेचा आवाज येतो आणि एकीकडे प्रकाश उजळतो, तेथे एक मुलगा (जणू सम्यक) उभा... धोतर, कांबळं, घुंगराची काठी, पायात तोडा, डोकीवर मोरपिसाचा मुकुट. हसतमुख. तो तेथूनच ओरडतो- आजीऽऽऽ आजोबाऽऽऽ एकदम पाखरं उडाल्यासारखा फडफडाट, वातावरण एकदम भारावलेलं.

ते दोघंही त्या 'विठ्ठला'ला वाकून नमस्कार करत दोन्ही बाजूंनी कुशीत घेतात. (अभंग ऐकू येऊ लागतो.)

*या विठूचा, गजर हरिनामाचा*
*झेंडा रोविला...*

(अभंग टिपेला जात असताना हळूहळू पडदा.)

***